॥ श्रीगणेशायनम: ॥ ॥ श्री दत्त कृपा ॥
हॉटेल बळीराजा
बळीराजा AGRO RESORT
फॅमिली गार्डन रेस्टॉरंट ॲण्ड फास्ट फूड
* साऊथ इंडियन
* पंजाबी * चायनीज
* तंदूर * महाराष्ट्रीयन
नाष्टा व जेवणाची उत्तम सोय
संपर्क : 8999854954, 8668738334
पत्ता : धुळे-सोलापूर हायवे, बिंदुसरा डॅम जवळ, मंझरी-कर्जनी फाटा, पाली बीड

सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
संपादक-जालिंदर ज्ञानदेव

हॉटेल गौरव
Hotel Gaurav
रेस्टो बार, डिलक्स रूम
एसपी ऑफिससमोर, बार्शी रोड, बीड
प्रो.प्रा.नितीन खोड
एक वेळ आवश्य भेट द्या

बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ६ वे ■ अंक १२७ ■ शनिवार दि. ०४ जुलै २०२६ ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 RNI MAHMAR/2021/81481 ■ किंमत ३ रुपये ■ पाने-४

Beed (Maharashtra) ■ Years-6 ■ Issu-127 ■ Saturday, 04 July -2026 ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ Price-3 rupees ■ Pages-4

## ज्योतीताई मेटे नाराज वेगळा निर्णय घेण्याच्या तयारीत?



प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा डॉक्टर ज्योती मेटे यांनी नुकताच महायुती सरकारवर जोरदार निशाना साधला. ज्योती मेटे यांनी महायुती सरकारला मोठा इशारा देत म्हटले की, त्यांच्याकडून लवकरच वेगळा निर्णय घेतला जाईल. ज्योती मेटे यांनी म्हटले की, शिवसंग्रामला महायुतीत दिवंगत विनायक मेटे यांच्या हयातीत जो वाटा मिळत होता तो त्यांच्या पश्चात मिळताना दिसत नाही. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता आणि नाराजी आहे. आगामी निवडणुकीचा परिणाम म्हणून आगामी निवडणुकात आम्हाला पाहावे लागेल. महायुतीचा घटक पक्ष म्हणून आम्ही महानगरपालिका आणि नगरपालिकामध्ये महाराष्ट्रात जिथे शक्य होईल तिथे भाजपा आणि राष्ट्रवादी अजित पवार गटासोबत काम केले. तसे असताना शिवसंग्रामच्या वाट्याला उपेक्षा येत आहे.



त्यामुळे वेगळा विचार न करता निवडणुकीच्या माध्यमातून आपली ताकद दाखवावी लागेल. वेगवेगळ्या पक्षांची भूमिका काही दिवसात पाहत आहोत तसं न करता विस्थापितांना संधी देण्यासाठी शिवसंग्राम आपलं अस्तित्व कायम राखून राजकारण करण्यावर ठाम आहे. आमच्या कार्यकर्त्यांना स्थिरस्थावर करण्यासाठी महायुतीने सन्मानजनक ठेवावे. महायुतीला नम्र आवाहन करतो शिवसंग्रामला योग्य वाटा देण्याच्या दृष्टिकोनातून आगामी काळात पावलं उचलली गेली पाहिजेत.

अन्यथा या कार्यकर्त्यांच्या मानसिकतेला >> पान २ वर...

## ४९ किलो गांजासह २९.५४ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्या पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, धर्मापुरी (ता. परळी) शिवारातून लाल रंगाच्या कारमधून अंमली पदार्थ (गांजा) वाहतूक होणार आहे.



दोन आरोपी अटकेत, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांची मोठी कारवाई

सदर माहितीच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन परळी ग्रामीण येथे जाऊन प्रभारी अधिकारी श्री. मल्हार शिवरकर यांना माहिती दिली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन परळी ग्रामीण यांच्या संयुक्त पथकाने धर्मापुरी शिवारातील अहमदपूर-अंबाजोगाई रोडवर सापळा रचून छापा टाकला.

या कारवाईदरम्यान मारुती सुझुकी कंपनीची ब्रेझा कार तपासली असता त्यामध्ये ४९ किलो गांजा आढळून आला. एकूण २९,५४,१६९/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी (१) अनिल बिभीषण फड (वय २५ वर्षे, रा. धर्मापुरी, ता. परळी) व (२) अरबाज युसूफ सय्यद (वय २३ वर्षे, रा. धर्मापुरी, ता. परळी) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, सदरचा गांजा त्यांनी (३) ईश्वर नवनाथ फड व (४) श्रीकांत भास्कर फड, दोघेही रा. धर्मापुरी, ता. परळी, यांच्या साथीने आणल्याची कबुली दिली.

यावरून वरील चारही आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन परळी ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर नं. ३२७/२०२६, कलम ८ (क), २०(ब) (ii) (क) एनडीपीएस (छउझड) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी क्रमांक १ व २ यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.सदरील कामगिरी नवनीत >> पान २ वर...

## किराणा दुकानांत चोरी करणाऱ्या अल्पवयीन टोळीचा शिवाजीनगर पोलिसांकडून पर्दाफाश

बीड । प्रतिनिधी

शहरातील किराणा दुकानांमध्ये चलाखीने चोरी करणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या टोळीचा शिवाजीनगर पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणी एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून टोळीतील इतर सदस्यांची महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

प्राथमिक तपासात असे निष्पन्न झाले की, हा अल्पवयीन मुलगा १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांचा गट तयार करून चोरी करायचा. चोरीसाठी तो अशा मुलांची निवड करायचा ज्यांच्याकडे पालकांची मोटारसायकल उपलब्ध असे. दुकानात शिरल्यावर हे मुले दुकानदाराला वस्तू आणण्यासाठी मागील भागात पाठवायचे. दुकानदार मागे जाताच, मुख्य सूत्रधार मुलगा गल्ला उघडून रोख रक्कम चोरून आपल्या साथीदारांसह मोटारसायकलवरून पसार व्हायचा.

पोलीस पथकाची धडाकेबाज कामगिरी

या प्रकरणाचा तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने केला. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, स.पो.नि. गुंजाळ मॅडम आणि डी.बी. पथकातील बाळकृष्ण राहडे, सुदर्शन ठोसर, अनंत गिरी, सचिन आगलावे व अनिल घटमळ यांनी ही कारवाई पूर्ण केली. ताब्यात घेतलेल्या बालकाच्या चौकशीतून चोरीत सहभागी असलेल्या आणखी तीन ते पाच अल्पवयीन मुलांची माहिती पोलिसांना मिळाली असून, त्यांचा शोध सुरू आहे. या कारवाईमुळे शहरातील चोरीच्या घटनांचा उलगडा झाला आहे. दरम्यान, शिवाजीनगर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, परिसरात काही संशयास्पद आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची अचानक प्रकृती बिघडली, ठाण्यातील रुग्णालयात दाखल

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सततचा वाढता कामाचा ताण आणि धावपळीमुळे त्यांना तीव्र ताप आणि प्रचंड अशक्तपणा जाणवू लागल्याने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सध्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याचे पक्षाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

अधिवेशनादरम्यान प्रकृती बिघडली, आजचे सर्व कार्यक्रम रद्द



मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अस्वस्थ वाटू लागले आणि त्यांना ताप आला. गेल्या काही दिवसांपासून राजकीय दौऱ्यांचे आणि बैठकांचे वेळापत्रक अत्यंत व्यस्त असल्याने त्यांच्या शरीरावर प्रचंड ताण आला होता. प्रकृती बिघडताच खबरदारीचा उपाय म्हणून त्यांचे पुढील सर्व नियोजित सार्वजनिक कार्यक्रम तातडीने रद्द करण्यात आले आणि त्यांना ठाण्यातील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले.

मध्यरात्री २ वाजता झाला पक्षप्रवेश

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजकीय >> पान २ वर...

## छत्रपती संभाजीनगरमधून अल्पवयीन मुलींची सूटका

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने एका गुन्ह्यातील अल्पवयीन पीडित मुलींची सुटका करण्यात यश मिळवले आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी कर्नाटकपर्यंत धाव घेत, अखेर छत्रपती संभाजीनगरमधून पीडित मुली व आरोपीला ताब्यात घेतले.

पोलीस ठाणे नेकनूर येथे दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर नंबर ३४८/२०२५ (कलम १३७(२) बीएनएस २०२३) चा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग करण्यात आला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांनी या प्रकरणाची सूत्रे हाती घेऊन फिर्यादी व साक्षीदारांची चौकशी केली. सुरुवातीला बीड जिल्ह्यात शोध घेतला असता आरोपी व पीडित मिळून आले नाहीत. तांत्रिक विश्लेषणातून ते कर्नाटक राज्यातील सिद्धी तालुक्यात असल्याचे समजले होते. मात्र, त्यानंतर मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार ते छत्रपती संभाजीनगर येथे आल्याचे स्पष्ट झाले. मिळालेल्या माहितीची खातरजमा करत, एएचटीयू पथक तातडीने २ जुलै रोजी छत्रपती संभाजीनगरला रवाना झाले. तेथील पुंडलिक नगर पोलिसांच्या मदतीने स्थानिक परिसरातील माहितीच्या ठिकाणाहून पीडित मुली आणि आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर पथकाने त्यांना नेकनूर पोलीस ठाण्यात पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी हजर केले. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि अपर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे, सहायक पोलीस उप निरीक्षक उषा चौरे, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे आणि पोलीस शिपाई भाऊसाहेब कारले यांचा समावेश होता.

## खांबामधील विद्युत प्रवाहाने बैलाचा मृत्यू

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाथापूर शिवारात पेरणी करत असताना शेतामध्ये उभा केलेल्या खांबामध्ये विद्युत प्रवाह आल्याने एका बैलाचा मृत्यू झाला असून सहा जण बाल बाल वाचल्याची घटना दि. १ जुलै रोजी घडली आहे. दरम्यान सदरील शेतकऱ्याला महावितरणाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.



नाथापूर शिवारात कैलास भाऊसाहेब चव्हाण हे आपल्या शेतामध्ये पेरणी करत होते. उशिरा आलेल्या >> पान २ वर...

## नागपूरला पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीला शिवाजीनगर डीबी पथकाने शोधले

बीड । प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून पळवून नेलेल्या एका अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात स्थानिक पोलिसांच्या डीबी पथकाला मोठे यश मिळाले आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी नागपूर गाठून अल्पवयीन मुलगा व मुलगी या दोघांना सुखरूप ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलगी शाळेत ये-जा करत असताना एका अल्पवयीन मुलाकडून तिचा वारंवार पाठलाग केला जात होता. यातून दोघांची ओळख झाली आणि नंतर ते दोघेही घरातून निघून गेले. पालकांनी तात्काळ शिवाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांनी तात्काळ एक विशेष पथक तयार केले. या पथकाने तांत्रिक तपास आणि विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून दोघांचे लोकेशन नागपूर येथे असल्याचे निश्चित केले. त्यानंतर पोलीस पथकाने नागपूरला जाऊन दोघांनाही सुरक्षित ताब्यात घेतले आणि बीडला आणले. आवश्यक कायदेशीर कार्यवाही पूर्ण करून दोघांनाही त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. शीतलकुमार बल्लाळ, सपोनि प्रल्हाद मुंडे, पोउपनि ज्ञानेश्वर धोत्रे, सहा. पो. उपनिरीक्षक >> पान २ वर...

## नाझिया इलाही खान यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करा -ॲड.शेख शफीक

बीड । प्रतिनिधी

नाझिया इलाही खान यांच्याविरोधात तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्चात बाबतीत, या मागणीसाठी आज शुक्रवारी (जुम्माच्या नमाजानंतर) बीड शहरातील बशीरगंज चौकात मोठ्या संख्येने नागरिकांनी लोकशाही मार्गाने निषेध आदोलन केले. आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाकडे त्वरित कारवाईची मागणी केली.




आंदोलनकर्त्यांनी आपल्या भाषणातून दावा केला की, संबंधित प्रकरणात अद्याप अपेक्षित कायदेशीर कारवाई झालेली नाही व तील आज पर्यंत अटक ही झालेली नाही त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान असली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली, कोणत्याही व्यक्तीने धार्मिक भावना दुखावतील अशी वक्तव्ये केली असतील तर त्याची निष्पक्ष चौकशी करून कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी अनेक सामाजिक, धार्मिक व स्थानिक कार्यकत्यांनीही आपली मते मांडली. त्यांनी प्रशासनाने या प्रकरणाची गांभीयनि दखल घ्यावी, संबंधित तक्रारींची तातडीने चौकशी करून योग्य ती कायदेशीर प्रक्रिया राबवावी, अशी मागणी केली. >> पान २ वर...

## ७० वर्षांची जीर्ण शाळा विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतणार? गणगेवाडी जिल्हा परिषद शाळेचे स्ट्रक्चरल ऑडिट करून नवीन इमारत उभारण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील केंद्र बेलगाव अंतर्गत गणगेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत अत्यंत जीर्णावस्थेत पोहोचली असून विद्यार्थी आणि शिक्षक अक्षरशः जीव मुठीत धरून शिक्षण व अध्यापन करत आहेत. सुमारे ७० वर्षांपूर्वी उभारलेल्या या इमारतीच्या भिंतींना मोठमोठे तडे गेले असून पावसाळ्यात वर्गखोल्या गळत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शाळेचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून नवीन वर्गखोल्यांच्या






१९५६ मध्ये स्थापन झालेल्या शाळेच्या भिंतींना तडे, पावसाळ्यात वर्गखोल्या गळक्या; डॉ. गणेश ढवळे यांचे शासनाकडे निवेदन

बांधकामासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून तरतूद करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य)चे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री >> पान २ वर...

## महिला शेतकऱ्यांना मान्यता

शेती आणि संलग्न कार्यात सहभागी असलेल्या महिलांना महिला शेतकरी म्हणून मान्यता देणारे 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' गुरुवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. शेतीच नव्हे तर पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालन तसेच इतर शेतीसंलग्न व्यवसायात असलेल्या महिलांना या विधेयकामुळे शेतकरी दर्जा मिळणार आहे. महिलेच्या नावावर सातबारा नसला तरी त्यांना शेतकरी प्रमाणपत्र दिले जाणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. भरणे यांनी बुधवारी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' विधानसभेत मंजुरीसाठी सादर केले होते. गुरुवारी त्यांनी या विधेयकाचा हेतू आणि उद्देश स्पष्ट केला. शेतजमीन महिलांच्या नावावर करणे हा विधेयकाचा उद्देश नाही, तर कृषिक्षेत्र अथवा शेतीशी संबंधित क्षेत्रात ज्या महिला काम करतात त्यांना स्वत:ची शेतकरी म्हणून ओळख मिळावी हा उद्देश असल्याचे भरणे यांनी सांगितले. हे केवळ शेतकरी प्रमाणपत्र नसेल तर महिला शेतक-यांची स्वतंत्र ओळख निर्माण करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याचा या विधेयकाचा उद्देश आहे. १५ ते २० टक्क्यांपेक्षाही कमी महिलांची नावे सातबारावर आहेत. ग्रामपंचायत आणि नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत मान्यता मिळाल्यानंतर महिलांना सहाय्यक कृषी अधिका-याकडून शेतकरी म्हणून प्रमाणपत्र मिळेल. विविध सरकारी योजनांतून महिला शेतक-यांना वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्याबरोबर त्यांच्यासाठी राज्य महिला शेतकरी निधीची स्थापना केली जाणार आहे. कृषीविषयक अर्थसहाय्य याशिवाय खते, बियाणे, पीक विमा, कृषी उत्पादन बाजारपेठेत पोहोचण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. या विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जयंत पाटील यांनी शेतकरी पतीच्या नावावरील ५० टक्के शेतजमीन महिलांच्या नावे करण्याची मागणी केली. विधेयकाच्या माध्यमातून महिलांची फसवणूक करू नका, सातबारावर महिलांची नोंद करा. कर्ज देताना वित्तीय संस्था महिला शेतक-यांना विनातारण कर्ज देणार आहेत का? महिला शेतक-यांकडून काय तारण घेणार? असे प्रश्न उपस्थित केले. शिवसेना ठाकरे गटाचे भास्कर जाधव म्हणाले, आपल्या राज्यात शेतकरी होण्यासाठी किमान अर्धा एकर जमीन असली पाहिजे, असा कायदा आहे. त्यामुळे महिलांच्या नावावर जोवर अर्धा एकर शेती नसेल तर त्यांना शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. ज्या महिलांना शेतकरी दर्जा देणार आहात, त्यांना अर्धा एकर जमीन कशी देणार, असा मुद्दा उपस्थित केला. या विधेयकावर विधानसभा सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेत अनेक सदस्यांनी सहभाग नोंदवून आपल्या सूचना व मते मांडली. त्यानंतर हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले. ग्रामीण भागातील लाखो महिला वर्षानुवर्षे शेती आणि शेतीपूरक व्यवसायात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत असल्या, तरी त्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख मिळत नव्हती. अनेक शासकीय योजनांमध्ये जमिनीच्या मालकीची अट असल्यामुळे प्रत्यक्ष शेती करणा-या महिला विविध लाभांपासून वंचित राहत होत्या. ही दरी दूर करून महिलांना सन्मान, अधिकार आणि समान संधी देण्याच्या उद्देशाने हे सर्वसमावेशक विधेयक तयार करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभागाने हे विधेयक तयार केले आहे. जागतिक महिला शेतकरी वर्षानिमित्त आयोजित संयुक्त बैठकीत महिला शेतक-यांना स्वतंत्र कायदेशीर दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार तज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, महिला शेतकरी आणि विविध भागधारकांशी व्यापक चर्चा करून हे विधेयक अंतिम करण्यात आले. महिला शेतकरी ही कुटुंबातील सहाय्यक नाही, तर शेतीच्या विकासाची समान भागीदार आहे. त्यामुळे तिला स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, अधिकार आणि शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळणे हा तिचा हक्क आहे. महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर बहुमान देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. ही प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाची बाब आहे. महिला शेतकरी सक्षम झाली तर महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र अधिक सक्षम, समृद्ध आणि आत्मनिर्भर होईल. या कायद्यातील सर्व लाभ केवळ प्रत्यक्ष शेतीशी संबंधित आणि पात्र महिला शेतक-यांनाच मिळणार असून, शेतीशी संबंध नसलेल्या व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळणार नाही. या विधेयकामुळे आतापर्यंत शेतमजूर किंवा भूमिहीन अशी ओळख असलेल्या लाखो महिलांना प्रथमच स्वतंत्र महिला शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळणार आहे. त्यामुळे त्यांच्या आत्मसन्मानाला नवी ओळख मिळण्याबरोबरच शासनाच्या विकास प्रक्रियेत त्यांचा अधिक प्रभावी सहभाग निश्चित होणार आहे. या विधेयकामध्ये शेती आणि शेतकरी या संज्ञांची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली आहे. पारंपरिक शेतीबरोबरच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, मधमाशीपालन, रेशीम उद्योग, सेंद्रिय शेती, मशरूम लागवड, वनोपज संकलन, भाडेपट्ट्यावरील शेती, भूमिहीन शेतकरी तसेच शेतमजुरांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शेतीशी प्रत्यक्ष जोडल्या जाणा-या लाखो महिलांना प्रथमच महिला शेतकरी म्हणून अधिकृत मान्यता मिळणार आहे. विविध शासकीय योजनांमध्ये महिलांचा सहभाग वाढावा, यासाठी हे विधेयक आणण्यात आले आहे. 'शेतकरी' हे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर महिलांना केंद्र शासनाच्या योजनांचाही लाभ होईल. शेतात राबणा-या आणि मजूर म्हणून काम करणा-या महिलांनाही या योजनेचा लाभ होईल. हा केवळ एक कायदा नाही, तर महिला शेतक-यांच्या श्रमाला, प्रतिष्ठेला आणि हक्कांना न्याय देणारे एक ऐतिहासिक पाऊल आहे.

# व्यसनधीनता एक गंभीर मानसिक आजार
# मानसोपचार तज्ज्ञ डॉ.जगदीश टेकाळे

दारु पिणे,सिगारेट ओढणे, चरस,गांजा,नशेच्या गोळ्यांचे सेवन ही मनोविकारांची लक्षणे वेळीच,योग्य उपचाराने ९५% रुग्ण होतात बरे, अन्यथा भयंकर दुष्परिणाम

बीड : वाढती व्यसनाधीनता हे वाढत्या गुन्हेगारीचे एक प्रमुख कारण बनले आहे. मात्र, दारू पिणे, सिगारेट ओढणे, चरस, गांजा, नशेच्या गोळ्यांचे सेवन हे मनोविकार आहे, हे लोकांना माहीतच नाही. त्यामुळे नशा करणारे व्यक्ती हळूहळू या मादक पदार्थांच्या आहारी जाऊन व्यसनाधीन बनतात. त्यातून अनेक जण हिंसक होऊन जीवघेणा हल्ला, खून हे असे अनेक समाजघातक कृत्ये घडतात. तर वेळीच आणि योग्य उपचाराने ९५ टक्के रुग्ण बरे होऊन मानसिक आणि सामाजिक स्वास्थही सुदृढ होते.

वाईट सवय म्हणून वाऱ्यावर सोडू नका !

व्यसनाधीनता हे मानसिक आजार असल्याने वेळीच, योग्य औषधोपचाराने बराही होऊ शकतो. त्यामुळे त्याला वाईट सवय लागली, तो वाया गेला. असे समजून त्याला वाऱ्यावर न सोडता नशेखोरीच्या या संकटातून सावरण्याची संधी आणि आधार द्या. यासाठी मानसोपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन डॉ.टेकाळे यांनी केले.

✻ दारू पिणे, सिगारेट ओढणे हे मानसिक आजार आहेत ?

होय, तंबाखूसह बिडी, सिगारेट, बियर, दारू, गांजा, भांग, अफू या नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन हे मानसिक आजाराच आहेत. नशेच्या गोळ्या घेणे हे सुद्धा एक घातक मनोविकार अनेकांना जडला आहे. झिंग येण्यासाठी इतरही अनेक घटक, पदार्थांचा सर्रास वापर होतो. वेळीच, योग्य औषधोपचाराने हे रोखता येते.

✻ व्यसनांची सवय लागते कशी ?

सुरुवातीला केवळ मौजमजा, जिज्ञासा किंवा फक्त टेन्शन आले म्हणून अमली पदार्थांची चव चाखणारे नंतर हळूहळू या गर्तेत आपोआपच अडकतात. स्पर्धेचे युग, कामांचा ताण, बिघडलेली जीवनशैली यामुळेही नशेखोरीत गुरफटले जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यात मग झोपडपट्टीपासून ते उच्चभ्रू लोकही आहेत. अनेक तरुण कधी मित्रांच्या आग्रहापोटी तर, काही वेळा अभ्यास करताना झोप येऊ नये म्हणून विद्यार्थी अमली पदार्थांचे सेवन करतात. हे प्रमाण आता वाढत चालले आहे.



✻ व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम कोणते ?

व्यसनाधीनताही गंभीर समस्या असून याचे अनेक दुष्परिणामही आहेत. मादक पदार्थांच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते. त्यातून दुखणे, कुटुंब कलह, घटस्फोट त्यापुढे समाज घातक कृत्ये नशेखोरीतून घडतात. याचे अनेक उदाहरणे आहेत. व्यसनाधीन व्यक्तीने जीवघेणा हल्ला, खून केल्याच्या अनेक घटना रोजच्याच झाल्या आहेत.

✻ तरुणवर्ग व्यसनांमध्ये गुरफटतोय ?

भावनिक चलबिचलता आणि जीवनात थ्रिल म्हणून किशोरवयीन मुलांमध्ये नशेखोरीचे प्रमाण वाढत आहे. अगदी शाळकरी मुलेसुद्धा आता सिगारेट, बियर, दारूचे सेवन करू लागले आहे. त्यापुढे गांजा, चरस, अफू, कोकिन, नशेच्या गोळ्यांची चटक बहुसंख्य युवापिढीला लागली आहे. तरुण मुलीही या विळख्यात अडकत असल्याने याकडे पालकांनी, समाजाने लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

✻ व्यसनांना नाही कसे म्हणायचे ?

सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यसनांच्या सवयी लागण्याआधीच नाही म्हणायचे. दुसरे म्हणजे व्यसनांपासून मुक्त झाल्यावर मनाचा ठाम निश्चय करा. मित्रांनी, कुणी आग्रह धरला तर सरळ आणि स्पष्ट शब्दांत नाही म्हणा. कुटुंबीयांसोबत वेळ घालवा. सतत कामांत व्यस्त आणि स्वस्थ रहा.

✻ नशेखोरीतून गुन्हेगारी फोफावते ?

नशेच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे मानसिक व शारीरिक संतुलन बिघडते. नशा करण्यासाठी अमली पदार्थ मिळाले नाही की मग चिडचिड, हिंसकवृत्ती, नशा भागवण्यासाठी चोरी, गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावते. हे त्या व्यक्तीसाठी, कुटुंब आणि समाजासाठी अत्यंत घातक आहे.

✻ पालकांनी काय काळजी घ्यावी ?

पालकांनी मुलांकडे विशेष लक्ष द्यावे, ते इंटरनेटचा काय वापर करतात, मोबाईलवर काय बघतात, मित्र कोण आहेत. याची माहिती घेत राहावी, मुलांसोबत गप्पा माराव्या, त्यांना बोलते करावे. मैदानी खेळ खेळावे. गायन, वादन आणि वाचनासह आवडते छंद जोपासावे.

औषधोपचाराने व्यसने सोडता येतात ?

होय, व्यसन करणे हे मनोविकार असल्याने त्यानुसार आजार समजूनच शारीरिक व मानसिक औषधोपचार केले जातात.व्यसने सोडू शकतो, याचा विश्वास निर्माण करून आध्यात्मिक शिक्षणाच्या जोडीने प्रेमळ आणि सुरक्षित वातावरण दिले जाते. त्यांच्यातील कलागुण ओळखून त्यानुसार कामांमध्ये व्यस्त ठेवून व्यसनाशिवायही आनंदी जीवन जगता येते. हे मनावर ठामपणे बिंबवले जाते. सातत्याने काही दिवसांत व्यसनाधीन व्यक्ती व्यसनमुक्त होतो.

मानसिक आजारांविषयी समज-गैरसमज ?

होय, समाज प्रगत झाला तरी आजही मानसिक आजारांविषयी अनेक समज-गैरसमज आहेत. महत्वाचे म्हणजे व्यवसनाधीनता हे मानसिक आजार असल्याचे लोकांना माहीतच नाही. औषधोपचाराने दारु, सिगारेट,चरस , गांजा, नशेच्या गोळ्यांचे इतकेच नव्हे तर ऑनलाईन गेमिंग आणि सतत मोबाईलमध्ये गुंग असणारेही या जोखडातून सुटले नाही.

व्यसनांना पहिल्यांदाच नाही म्हणा

आज घडीला हजारो-लाखो तरुण नशेखोरीत गुरफटल्याने गुन्हेगारीच्या अनेक घटना घडत आहेत. याचे दुष्परिणाम भयंकर आहेत. व्यसनांमुळे शारीरिक,मानसिक,,आर्थिक आणि कौटुंबिक हानी होते. योग्य मार्गदर्शन आणि उपचाराने या विळख्यातून बाहेर पडता येते. परंतु पहिल्यांदाच व्यसनांना नाही म्हणणे हे त्याहून चांगले असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

पान १/४ वरून

### माजी सैनिक तथा ज्येष्ठ सामाजिक

त्यांचा या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरव करण्यात आला. या पुरस्कारामुळे प्रकाश वाघमारे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सामाजिक, राजकीय आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे. या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन युवा लोकमित्र परिवार, बीड यांच्या वतीने करण्यात आले होते. पुरस्कार निवड समितीने त्यांच्या देशसेवा व समाजसेवेतील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करत हा सन्मान प्रदान केला. याबाबतची माहिती साप्ताहिक युवा लोकमित्रचे संपादक शेख ताहेर जाफर यांनी दिली.

### गेवराईच्या भूमिपुत्राचा राज्यपालांच्या

हिताचे कामे केली आहेत. थेट बांधावर जावून परिसरातील शेतकऱ्यांना विविध योजनेची माहिती दिल्याने या भागात शेतकऱ्यांचा मोठा फायदा झालेला असून त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, तसेच राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. तर पुरस्काराबद्दल त्यांचे जि.अ.कृ.अ. सुभाष साळवे, कृ.उप.सं. जाधवर ,तं.अ.मगर, वाघ ,कृ.वि.केंद्र खामगावचे व.शा.डॉ.हनुमान गरुड, गेवराई ता.कृ.अ. सचिन गिरी, अभयकुमार वडकुते, मं.कृ.आ मस्के, स.कृ.अ. सुहास शिंदे, सूरपम, बी.जि.सीएससी व्य.दिनेश जाधव,मं.कृ.अ वैभव डोंगरे, उप.कृ.अ. श्रीराम पवार, स.कृ.अ.प्रकाश वाघमारे, आत्मा विभागाचे पठाण, काळे, जोशी, शिंदे ,घोडके यांच्या सह शेतकरी बांधव तसेच मित्र परिवाराकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम

ज्ञानेश्वर महाराज व श्री.संत तुकाराम महाराज यांच्या पालखीमध्ये हजारो वारकरी समाविष्ट झालेले असतात. बीड जिल्ह्यातुन गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग या दिंडीमध्ये सहभागी होतांना दिसून येऊ लागला आहे.अखंड महाराष्ट्रचे दैवत आणि जात पात धर्म पंथापासुन दुर ठेवणारे वारकऱ्यांच्या कुळात अनेक जण सहभागी होत आहेत.यातुनच वारकरी वैष्णवधर्म हा सामाजिक एकता निर्माण करण्यासाठी किती महत्त्वाचा आहे हे दिसून येते. त्यासाठीच बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी वेगवेगळ्या दिंडीमध्ये सहभागी होत मानव धर्माची पताका अटकेपार फडकवण्यासाठी या सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन अ.भा.वारकरी मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष ह.भ.प.हरिदास भाऊ जोगदंड यांनी केले आहे.

### शारीरिक शिक्षण विभागातील

अध्यक्ष मा.बापूसाहेब सोळूके,अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितिचे बीड जिल्हा अध्यक्ष मा.बालाजी इंगोले,अ.भा.युवक मराठा महासंघचे बीड जिल्हा अध्यक्ष मा.भागवतराव मस्के, वरवटी / आ.धानोरा बीडचे सरपंच मा.बालासाहेब (आबा) इंगोले,मराठा महासंघचे बीड जिल्हा उपाध्यक्ष मा.परमेश्वर बप्पा कवचट, मराठा महासंघचे बीड जिल्हा उपाध्यक्ष मा.शामराव गायकवाड, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिति मराठवाडा अध्यक्ष सौ.प्रजाक्ताताई डोंगरे ,अ.भा.भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिति बीड ता.उपध्याक्ष मा.प्रा.दत्ताराव काळे सर,मा.शिवाजीराव नवले पाटील, पत्रकार मा.संतोष जोगदंड,मा.अभय कुमार पांडे,मा.बंडू आप्पा कोलंगडे,मा.उमेश सितोळे सर, यांच्या सह इतर कार्यकर्ता व क्रीडा प्रेमी तसेच अखिल भारतीय मराठा महासंघ व अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिति बीड जिल्हा वतीने सत्कार करून शुभेच्छा देन्यात आल्या, क्रीडाप्रेमींना नवी दिशा आणि प्रेरणा लाभो, हीच सदिच्छा.....

### मोठेवाडी येथील युवक

आशीर्वादाला देत विलास यांनी सर्वांचे आभार मानले. मोठेवाडी गावातील सुपुत्राची भारतीय सैन्यात निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण असून गावकऱ्यांमध्ये अभिमानाची भावना जागृत झाली आहे. यावेळी माजी सरपंच अविनाश गोंडे,दत्तात्रय चव्हाण,उपसरपंच अंगदराव खेत्री, पत्रकार राजाभाऊ पास्टे,ॲड. पांडुरंग गोंडे, सुदर्शन हिवरकर,दत्तात्रय तपसे,भिमराव पास्टे,रामेश्वर चव्हाण,बालाजी रेडे,बाळु जंवदळे,दिनकर पास्टे,मदन गोंगाने,अशोक कदम,दादा पास्टे, आदित्य गोंडे,वसंत पास्टे,श्रीकांत पास्टे,बाबा नावडकर,बंडू साठे, यांच्यासह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

### ७० वर्षांची जीर्ण शाळा विद्यार्थ्यांच्या

सुनेत्राताई पवार, शिक्षणमंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना लेखी निवेदन देण्यात आले

पान १/४ वरून

आहे. गणगेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची स्थापना १९५६ साली झाली. सध्या या शाळेत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे ११० विद्यार्थी शिक्षण घेत असून ६ शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, इमारत मोडकळीस आल्याने कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने नवीन इमारतीचा प्रस्ताव मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे. शाळा सुरू झाल्यापासून अनेक पिढ्यांनी याच इमारतीत शिक्षण घेतले आहे. मात्र, आज हीच इमारत विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण करणारी ठरत असून शासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे.

दरवर्षी वरिष्ठांना अहवाल; तरीही निर्णय प्रलंबित

गणगेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ भोरे यांनी सांगितले की, शाळेची इमारत सुमारे ७० वर्षे जुनी असून भिंतींना मोठ्या प्रमाणात तडे गेले आहेत. शाळेच्या जीर्ण अवस्थेबाबत दरवर्षी वरिष्ठ कार्यालयाला अहवाल सादर करण्यात येतो. मात्र, अद्याप नवीन इमारत किंवा दुरुस्तीबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची चिंता वाढली आहे.

आ. सुरेश आण्णा धस यांनी तातडीने लक्ष घालावे - डॉ. गणेश ढवळे

आष्टी तालुक्यातील गणगेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची अवस्था अत्यंत धोकादायक झाली असून विद्यार्थ्यांचे भविष्य आणि सुरक्षितता दोन्ही धोक्यात आले आहेत. त्यामुळे नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांनी तातडीने लक्ष घालून शासनस्तरावर पाठपुरावा करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, असेही त्यांनी नमूद केले आहे.

आंदोलनाच्या इशा-यानंतर शिक्षणाधिकारी मयुरेश मोरे यांचे प्रस्तावित मंजुरीचे पत्र

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दि.०६ सोमवार रोजी जिल्हा परिषद आवारात आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तरतूद करण्यात येऊन विद्यार्थी संख्येनुसार व उपलब्ध खोल्या निकषांनुसार नविन वर्गखोल्या मंजुरी देण्यात येईल असे लेखी पत्र आंदोलनकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना दिले.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर मो.नं.८१८०९२७५७२

### ज्योतीताई मेटे नाराज

थोपवणे अवघड जाईल. ही खंत मुख्यमंत्र्यांना बोलून दाखवली आहे. शिवसंग्रामने विनायक मेटे यांना गमावले मात्र ताकद गमावलेली नाही. याच ताकदीचा विचार करून महायुतीने योग्य तो सन्मान द्यावा. पक्षाची धोरणं असतील अन्य सहयोगी पक्षांसाठी त्यात शिवसंग्रामचा विचार झाला पाहिजे. -मात्र तसे घडताना दिसले नाही.

पुढे ज्योती मेटे यांनी म्हटले की, आगामी येऊ घातलेल्या निवडणुकीत कार्यकर्त्यांना आवर घालण्यास कठीण जाईल. अद्याप स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतलेला नाही. बीड नगरपालिकेत राष्ट्रवादी अजित पवार गटासोबत आम्ही लढलो. मात्र, जी आश्वासन देण्यात आली त्याची पूर्तता झाली नाही. आता येऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत बीड आहे. ज्योती मेटे यांनी एकप्रकारचा अत्यंत मोठा इशाराच महायुती सरकारला दिला आहे. ज्यामुळे मोठी खळबळ उडालीये.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची

कार्यक्रमांचे वेळापत्रकही कोलमडले. धुळ्यातील ठाकरे सेनेच्या उपनेत्या शुभांगी पाटील यांचा प्रवेश सोहळा शुक्रवारी संध्याकाळी ४ वाजता ठाण्यातील 'गंगुबाई शिंदे हॉल'मध्ये होणार होता. पण एकनाथ शिंदे यांच्या आजारपणामुळे पुढे ढलावा लागला. मात्र, त्यानंतर मध्यरात्री २ च्या सुमारास खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

'ऑपरेशन टायगर'मुळे वाढली होती धावपळ ?

गेल्या काही दिवसांत महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत ठाकरे सेनेचे ६ खासदार आणि विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी शिंदे गटात प्रवेश केला. या संपूर्ण प्रक्रियेसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सतत दिल्ली आणि मुंबई अशा वाऱ्या कराव्या लागल्या होत्या. या सततच्या प्रवासाचा आणि दगदगीचा त्यांच्या तब्येतीवर परिणाम झाल्याचे बोलले जात आहे. सध्या काळजीचे कोणतेही कारण नसून, त्यांना काही दिवस विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे.

### ४९ किलो गांजासह

कॉंवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, बीड, श्री ऋषीकेश शिंदे, सहा. पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई व शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णु सानप, गोविंद भताने, गोविंद राख, विकास राठोड, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, बबन सलगर, विकी सुरवसे, चालक अतुल हराळे, सुनिल राठोड सर्व नेमणुक

पान १/४ वरून

स्थानिक गुन्हे शाखा, बीड तसेच पोलीस ठाणे परळी ग्रामीण चे पोनि/मल्हार शिवरकर, पोउपनि/निमोने, पुजरवाड, पो.हवा/वाले, केदार, पोकळे यांनी मिळून केली आहे.

### खांबामधील विद्युत प्रवाहाने

पावसाने जमिनीत ओल झाल्यामुळे या भागात सध्या पेरणीची लगबग सुरू आहे. अशा परिस्थितीत शेतकरी कैलास चव्हाण हे पेरणी करत होते पेरणी करत असताना शेतात महावितरणने उभा केलेल्या पोलमध्ये विद्युत प्रवाह उतरला होता. याची कल्पना नसताना या खांबा जवळून बैल आणि पेरणी करणारे जात असतानाच विद्युत खंबा मधील विद्युत प्रवाहाने बैलाला झटका बसला आणि बैल जागेवरच मृत्यू पावला मात्र हा प्रकार सदरील शेतकऱ्यांच्या लक्षात येतात जवळ असलेले नागरिक वाचले असून एका बैलाला वाचवण्यात सदरील शेतकऱ्याला यश आले आहे. हा बैल मृत्यू पावल्यामुळे या शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून जवळपास एक लाख रुपये किमतीचा हा बैल मरण पावल्याने परिसरातील शेतकऱ्यांतून हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान महावितरणच्या चुकीमुळे थांबा मध्ये विद्युत प्रवाह उतरला असून सदरील विद्युत प्रवाहने बैलाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे महावितरणने सदरील शेतकऱ्याला नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.

### राजेंद्र मस्के यांचा वाढदिवस

केलेल्या पाठपुराव्याचे विशेष कौतुक केले. समाजहितासाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असून आगामी काळातही त्यांच्या नेतृत्वाखाली जनसेवेचे कार्य अधिक बळकट होईल, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. राजेंद्रजी मस्के यांच्या राशी निवासस्थानी सकाळपासूनच शुभेच्छुकांची रिघ लागली होती. यावेळी रायगड गुड मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे तालुकाप्रमुख, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी, मित्रपरिवार व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त आयोजित अल्पोपहाराचा उपस्थितांनी लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदी व आपुलकीच्या वातावरणात पार पडला. उपस्थितांच्या शुभेच्छा, प्रेम आणि सहकार्यामुळे समाजसेवेचा हा प्रवास अधिक बळकट होत राहो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. राशी निवासस्थानी पुढील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून राजेंद्रजी मस्के यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

### नाझिया इलाही खान यांच्यावर

कायद्यावरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी प्रशासनाने कोणताही विलंब न करता निर्णय घ्यावा , असेही वक्त्यांनी नमूद केले.आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास भविष्यात अधिक व्यापक आणि तीव्र लोकशाही मार्गाने जनआंदोलन उभारण्यात येईल. मात्र, हे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण व लोकशाही पद्धतीने करण्यात येत असून कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले, बशीरगंज चौकात झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलन शांततेत पार पडले असून, नागरिकांनी प्रशासनाकडून तातडीच्या आणि निष्पक्ष कारवाईची अपेक्षा व्यक्त केली.

कारवाईला विलंब का ? प्रशासन नेमकं कुणाची वाट पाहत आहे ?

बीड शहरातील बशीरगंज चौकात शुक्रवारी जुम्माच्या नमाजानंतर झालेल्या निषेध आंदोलनात सहभागी नागरिकांनी नाझिया इलाही खान यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. संबंधित प्रकरणात तातडीने कारवाई करण्यात यावी, अन्यथा आगामी काळात यापेक्षा मोठे आणि तीव्र लोकशाही मार्गाने जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिला.या आंदोलन शेख सलमान व इलियास बागवान या दोन समाजसेवक व त्यांच्या टीम मेहनत घेतली.आंदोलनादरम्यान मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### नागपूरला पळवून नेलेल्या

संतोष राऊत आणि पोलीस अंमलदार अशोक शिंदे यांनी केली. विशेषतः अशोक शिंदे आणि संतोष राऊत यांनी तांत्रिक तपास व चिकाटीच्या जोरावर ही शोधमोहीम यशस्वी केली.

**पालकांना आवाहन:**

शिवाजीनगर पोलिसांनी पालकांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या पाल्यांच्या हालचाली, मित्रपरिवार तसेच मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वापरावर वेळोवेळी लक्ष ठेवावे. कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

# ‘मी आयएएसमधून निवृत्त होईन, सार्वजनिक सेवेतून नाही!’, तुकाराम मुंढेंच्या विधानाने राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा

नागपूर । प्रतिनिधी

राज्याचे वरिष्ठ आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी ‘मी आयएएसमधून निवृत्त होईन, पण सार्वजनिक सेवेतून कधीही निवृत्त होणार नाही’ असे स्पष्ट विधान करताच त्यांच्या भविष्यातील भूमिकेबाबत राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चर्चांना वेग आला आहे.

**सार्वजनिक सेवेची भूमिका कायम ठेवण्याचा निर्धार**

‘प्रवाहाच्या विरुद्ध जाणारा माणूस मूर्ख नसतो, तर तो धैर्यवान असतो. मी आयएएसमधून निवृत्त होईन, पण सार्वजनिक सेवेतून कधीही निवृत्त होणार नाही,’ असे परखड प्रतिपादन राज्याचे वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी केले. त्यांच्या या विधानामुळे राज्यातील राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. शासकीय सेवेनंतरही समाजासाठी कार्यरत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केल्याने त्यांच्या पुढील वाटचालीबाबत उत्सुकता वाढली आहे.

**सोशल मीडियावरील पोस्टने वाढविले तर्कवितर्क**

मुंढे यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम खात्यावर ‘इफ आय कॅन नोट, हू एल्स कॅन? लिडरशीप’ असा संदेश पोस्ट केला आहे. या पोस्टनंतर त्यांच्या भविष्यातील भूमिकेबाबत सोशल मीडियावर विविध तर्कवितर्क सुरू झाले आहेत. ‘सार्वजनिक सेवेतून कधीही निवृत्त होणार नाही’ या विधानाची जोड या पोस्टशी लावत अनेकांनी त्यांच्या पुढील निर्णयांबाबत चर्चा सुरू केली आहे. काहींनी हे सामाजिक क्षेत्रातील सक्रिय भूमिकेचे संकेत मानले असून, तर काहींनी भविष्यातील राजकीय शक्यतांवरही भाष्य केले आहे. मात्र, मुंढे यांनी यासंदर्भात कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही.



**प्रशासकीय कारकिर्दीनंतरच्या नव्या इनिंगची चर्चा**

तुकाराम मुंढे हे कठोर, शिस्तप्रिय आणि नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी ओळखले जातात. विविध पदांवरील त्यांच्या वारंवार झालेल्या बदल्यांमुळे ते नेहमीच चर्चेत राहिले आहेत. अशा पार्श्वभूमीवर त्यांनी सार्वजनिक सेवेत कायम सक्रिय राहण्याची व्यक्त केलेली भूमिका लक्षवेधी मानली जात आहे. शासकीय सेवेनंतर ते थेट जनतेमध्ये काम करणार का, सामाजिक चळवळीचे नेतृत्व स्वीकारणार का किंवा अन्य कोणत्या माध्यमातून सार्वजनिक जीवनात सक्रिय राहणार, याबाबत राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा रंगू लागल्या आहेत. साताऱ्यासह राज्यभरात त्यांच्या पुढील वाटचालीबाबत उत्सुकता व्यक्त केली जात आहे.

**भेसळविरोधी मोहिमेमुळे पुन्हा चर्चेत**

सध्या राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागात कार्यरत असलेले मुंढे यांनी भेसळयुक्त अन्नपदार्थ आणि बनावट औषधांविरोधात व्यापक मोहीम हाती घेतली आहे. राज्यभर धडक तपासण्या, कठोर कारवाया आणि नियमांची प्रभावी अंमलबजावणी यामुळे अनेक व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. या मोहिमेमुळे आणखी मोठ्या गैरव्यवहारांचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, राज्य सरकारने त्यांच्याकडील पालक सचिवपदाची जबाबदारी काढून घेतल्याने प्रशासकीय वर्तुळातही विविध चर्चांना उधाण आले आहे. त्यांच्या कठोर कार्यशैलीमुळे काही हितसंबंधी नाराज असल्याची चर्चा असली, तरी या संदर्भात सरकारकडून कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे मुंढे यांची भेसळविरोधी मोहीम आणि त्यांच्या भविष्यातील सार्वजनिक भूमिकेबाबतची उत्सुकता कायम आहे.

## महासांगवीच्या चैत्राली सानप ठरल्या ‘महाराष्ट्राची महा सरपंच’

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावाने आज राज्यभरात आपल्या कार्याचा ठसा उमटवत एक नवा इतिहास रचला आहे. मुंबईत पार पडलेल्या महा सरपंच २०२६’ या भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात महासांगवीच्या सरपंच चैत्राली सानप यांना ’महाराष्ट्राची महा सरपंच’ या अत्यंत मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला.

**१४ पैकी अव्वल स्थान**

महाराष्ट्रभरातील हजारो ग्रामपंचायतींमधून निवड झालेल्या १४ आदर्श सरपंचांच्या यादीत महासांगवीने बाजी मारली. गावातील रोजगार निर्मिती, लोकसहभागातून राबवलेले स्वच्छता अभियान आणि गावातील प्रत्येक घरापर्यंत वीज व शुद्ध पाण्याची सोय, या तीन मुख्य आघाड्यांवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे महासांगवीने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

सत्कार सोहळ्यात उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी महासांगवीच्या पुढील विकासासाठी ५० लाख रुपयांचा विशेष निधी जाहीर केला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, चैत्राली सानप यांच्यासारखे तरुण नेतृत्व आज महाराष्ट्र घडवत आहे. महासांगवी गावाने विकासाचे जे मॉडेल उभे केले आहे, ते संपूर्ण राज्यासाठी एक प्रेरणादायी आदर्श आहे. या सोहळ्यास राज्याचे ग्रामविकास मंत्री मा. जयकुमार गोरे, माजी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मंत्री योगेश कदम, भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सरपंच चैत्राली सानप यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## मुस्लिम समाजाने गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर द्यावा– डॉ. खान

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थित्यंतरे वेगाने घडत आहे. अशा वेळी मुस्लिम समाजाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. संयमित, सकारात्मक आणि शिस्तबद्ध वागणुकीतून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवण्यावर भर द्यावा. त्यानेच समाजाची सर्वांगीण प्रगती साधता येईल, असे प्रतिपादन माजी खासदार तथा माजी मंत्री डॉ. फौजिया खान यांनी केले. सामाजिक कार्य तसेच राज्यसभेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल फेडरेशन ऑफ ऑल मायनॉरिटी एज्युकेशनल ऑर्गनायझेशनच्या वतीने डॉ. फौजिया खान यांचा मौलाना आझाद संशोधन सभागृहात सत्कार करण्यात आला. या वेळी बीसीयूडीचे माजी संचालक डॉ. ए. जी. खान, जामिया इस्लामिया काशिफूल उलूमचे अध्यक्ष हाजी अब्दुल जब्बार, एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल गफ्फार कादरी, हसीन अख्तर, डॉ. मकदुम फारुकी आदींची उपस्थिती होती. सत्काराला उत्तर देताना डॉ. खान म्हणाल्या, राज्यसभेच्या सदस्य म्हणून विविध लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला. केंद्र सरकारच्या सहकार्याने मराठवाड्यात आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प सुरू करण्यासाठी प्रयत्न केले.

‘‘बिफोर करोना मेमरीज फेड’ पुस्तकाचे प्रकाशन या वेळी कोरोनाकाळात महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाने केलेल्या सामाजिक कार्याची नोंद असलेले सय्यद रिजवानउल्लाह लिखित बिफोर करोना मेमरीज फेड या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या वेळी खालिद सैफुद्दीन, मोहंमद वासिल, डॉ. इरफान रऊफ आणि पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## माहोराच्या सरपंचाकडून सरकारी जागेवर अतिक्रमण

### सरपंचपद अपात्र ठरविण्याची मागणी

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील माहोरा गावचे सरपंच सुभाष दासू चव्हाण यांनी सरकारी गायरान जमिनीवर सिमेंट काँक्रीटचे बांधकाम करून अतिक्रमण केल्याप्रकरणी त्यांना सरपंच पदावरून पायउतार करावे अन्यथा ; १५ ऑगस्ट २०२६ स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा तुकाराम धनु राठोड यांनी दिला आहे.

या संदर्भात मा. जिल्हाधिकारी जालना यांना लेखी निवेदन दिले असून माहोरा गावचे सरपंच सुभाष दासू चव्हाण यांनी सरकारी गायरान जमिनीवर सिमेंट काँक्रेटचे बांधकाम करून अतिक्रमण केल्याची तक्रार करण्यात आली होती. यासंदर्भात संबंधित सरपंचाने सरकारी गायरान जमिनीवर अतिक्रमण केल्याचा अहवाल गटविकास अधिकारी यांनी प्रशासनाला पाठवूनही त्यांना अद्याप सरपंच पदावरून पायउतार करण्यात आलेले नाही. याउलट तक्रारी का केल्या म्हणून सरपंचाने शिवीगाळ व मारहाण केली होती. या संदर्भात सेवली पोलीस स्टेशन येथे सरपंच विरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली आहे. वेळोवेळी तक्रारी करूनही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे स्वातंत्र्यदिनी आमरण उपोषणाचा मार्ग निवडल्याचे तुकाराम धनु राठोड यांनी निवेदनात म्हटले आहे. तसेच गावात मागील अनेक वर्षापासून सरपंचाच्या आशीर्वादाने अवैध दारू विक्री, जुगार अड्डे सुरू असून सरपंचा विरोधात अनेक गुन्ह्याची नोंद आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी जालना यांनी सखोल चौकशी करून सरपंच सुभाष दासू चव्हाण यांना सरपंच पदावरून पायउतार करावे अन्यथा ; १५ ऑगस्ट २०२६ स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा शेवटी निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती मा. विभागीय आयुक्त, मा. पोलीस अधीक्षक जालना, मा. उपविभागीय अधिकारी परतुर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर, मा. तहसीलदार मंठा, मा. गटविकास अधिकारी मंठा यांना देण्यात आल्या आहेत.

## महिला शेतकऱ्यांना ’शेतकरी’ म्हणून सन्मानाची ओळख विधेयकामुळे आत्मविश्वासाला नवे बळ मिळेल

मुंबई । प्रतिनिधी

दिवसरात्र शेतात राबणाऱ्या महिलांना आतापर्यंत बिनपगारी कामगारासारखी वागणूक मिळाली; मात्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकामुळे त्यांना ’शेतकरी’ म्हणून सन्मानाची ओळख मिळणार असून, त्यांच्या आत्मविश्वासाला नवे बळ मिळेल, असा विश्वास पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

विधानसभेत महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना मुंडे बोलत होत्या. शहरात नोकरी करणारी महिला जशी ’वर्किंग वुमन’ आहे, त्याचप्रमाणे घर आणि शेतीची दुहेरी जबाबदारी सांभाळणारी ग्रामीण महिलाही तितकीच ’करिअर वुमन’ असल्याचे त्यांनी सांगितले.

**संरक्षणापेक्षा सन्मान व समानतेची वागणूक महत्वाची**

बळीराजाच्या मागे उभी असलेल्या अन्नपूर्णेला ओळख देण्याचे काम या विधेयकातून होत असल्याचे सांगत त्यांनी विधेयकाचे स्वागत केले. महिलेला संरक्षणापेक्षा सन्मान आणि समानतेची वागणूक मिळणे अधिक महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महिला अनेकदा स्वतःच्या हक्कांवर पाणी सोडतात. वारसाहक्काचा अधिकार असूनही अनेक बहिणी भावाच्या नावावर हिस्सा करून देतात. मात्र या विधेयकातून महिलांनी जमिनीची मालकी मागितलेली नसून, शेतात कष्ट करणारी व्यक्ती म्हणून ’शेतकरी’ ही ओळख मागितली आहे. शासनाने ही भावना ओळखून विधेयक आणल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

**धैर्य अन् आत्मविश्वासाला बळ**

शेती संकटात असतानाही ग्रामीण महिला कुटुंब आणि शेतीचा आधार बनून उभी राहते. शेतकरी आत्महत्येनंतर संपूर्ण संसाराची जबाबदारीही तीच पेलते. त्यामुळे या विधेयकामुळे तिच्या धैर्याला आणि आत्मविश्वासाला अधिक बळ मिळेल, असे मुंडे म्हणाल्या.

जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाई आणि ताराबाई यांसारख्या महिलांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी प्रत्येक घरात सक्षम स्त्री घडविण्याची गरज व्यक्त केली. सक्षम महिला हीच समाज आणि राज्याच्या प्रगतीची खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.

**दिवसरात्र राबणाऱ्या हातांना..**

भाषणाच्या शेवटी त्यांनी महिलेच्या अविरत कष्टांचा गौरव करणाऱ्या ओळी सादर केल्या. दिवसरात्र राबणाऱ्या हातांना कधीच कसा आराम नाही, असा एकही दिवस नसेल ज्या दिवशी तिला काम नाही. घरातील प्रत्येक कामावर जणू तिच्या नावाचा शिक्का बसला आहे, सगळ्या कामाचा जणू तिने ठेकाच घेतला आहे. असे वागणे तिचे जणू व्यसनच जडले कामाचे आणि मोबदला काय हवा? चार फक्त शब्द प्रेमाचे. जगाच्या मंचावर स्त्रीसारखा कलाकार नाही आणि आजपर्यंत त्या स्त्रीसारखा कामगारही मी पाहिलेला नाही, असे म्हणत त्यांनी महिला शेतकऱ्यांच्या श्रमांना सलाम केला.



## उत्तराखंडमध्ये पावसाचा कहर, बद्रीनाथ मार्गावर दरड कोसळली

मुंबई । प्रतिनिधी

मुसळधार पावसामुळे उत्तराखंडमध्ये कहर केला आहे. राज्यात नद्यांना पूर आला आहे. भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले आहेत. बद्रीनाथ महामार्ग अनेक ठिकाणी बंद करण्यात आला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव ऋषिकेशमध्ये रिव्हर राफ्टिंगवरही बंदी घालण्यात आली आहे. बद्रीनाथ मार्गावर दरड कोसळल्याने शेकडोच्या संख्येने भाविक अडकले आहेत. बद्रीनाथकडे जाणाऱ्या मार्गावर दरड कोसळल्याने महाराष्ट्रातल्या भाविकांचा सुद्धा खोळंबा झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक प्रवासी बद्रीनाथमध्ये अडकले आहेत. गेल्या १२ तासांपासून प्रवासी एकाच जागेवर अडकून आहेत. दरम्यान, प्रशासनाकडून दरड बाजूला काढण्याचे काम सुरू आहे.

**मोठ्या ढिगाऱ्यांमुळे बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्ग बंद**

चमोली जिल्ह्यातील गुलाबकोटीजवळ मोठ्या ढिगाऱ्यांमुळे बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्ग बंद झाला आहे. रस्ता पुन्हा सुरू करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. बद्रीनाथमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे अलकनंदा नदीची पाणी पातळी वाढली आहे. पावसामुळे मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांची संख्या कमी झाली आहे. तथापि, दर्शन सुरू आहे. गुलाबकोटी येथे बद्रीनाथ मार्ग बंद झाल्यामुळे भाविकांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. मान्सूनच्या काळात हवामानाचा बद्रीनाथ यात्रेवर नेहमीच परिणाम होतो. किंबहुना, मुसळधार पावसामुळे विविध ठिकाणी भूस्खलनाचा धोका वाढला आहे. त्यामुळे, प्रशासन भाविकांना सुरक्षित प्रवास करण्याचा सल्ला देत आहे.रुद्रप्रयाग जिल्ह्यातील धारी देवीजवळील शिरोबागड येथे ऋषिकेश–बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला, त्यामुळे चारधाम यात्रेला निघालेले यात्रेकरू अडकून पडले आहेत. खराब हवामानामुळे, केदारनाथसाठी चालणाऱ्या सर्व आठ हेलिकॉप्टर सेवा ५ जुलैपर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत. जिल्हा प्रशासनाने सांगितले की, हा निर्णय यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी घेण्यात आला आहे. हवामानाच्या परिस्थितीनुसार ही स्थगिती पुढे वाढवली जाऊ शकते.

टिहरी जिल्ह्यातील सततच्या पावसाचा जनजीवनावरील परिणाम आता स्पष्टपणे दिसून येत आहे. भिलंगणा भागातील नाईलचमी गडातील पाण्याची पातळी वेगाने वाढली आहे. जिल्ह्यातील अनेक नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत आहेत. प्रशासन आणि पोलीस हाय अलर्टवर आहेत. दरम्यान, भूस्खलन आणि झाडे पडल्यामुळे अनेक ठिकाणी रस्ते तात्पुरते बंद करण्यात आले आहेत.

### उत्तराखंडच्या बहुतांश भागात मान्सून सक्रिय

**हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार उत्तराखंडच्या बहुतांश भागात मान्सून आता सक्रिय झाला आहे. पिथोरगड, रुद्रप्रयाग, चमोली, हरिद्वार, उधम सिंग नगर आणि बागेश्वरमध्ये काल रात्रीपासून पाऊस सुरू आहे. हवामान विभागाने बागेश्वरमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केल्यामुळे, प्रशासनाने आज २ जुलै रोजी इयत्ता पहिली ते बारावीच्या सर्व शाळा आणि अंगणवाडी केंद्रांना सुट्टी जाहीर केली आहे. बागेश्वरमध्ये मुसळधार पावसामुळे डोंगरावरून मलबा रस्त्यांवर आला आहे. ढिगाऱ्यांमुळे १४ ग्रामीण रस्ते बंद झाले असून, त्यामुळे सुमारे ५० गावांचा संपर्क तुटला आहे. अनेक भागांमध्ये वीजपुरवठाही खंडित झाला आहे. रस्त्यांवरील ढिगारा हटवण्यासाठी प्रशासन जेसीबी आणि इतर यंत्रसामग्रीचा वापर करत आहे.**

## पोलीस कोठडीत मृत्यूप्रकरणी ठाणेदारासह नऊ पोलिसांना जन्मठेप; तब्बल १५ वर्षांनंतर पीडित कुटुंबाला न्याय

अकोला । प्रतिनिधी

आरोपीचा पोलीस कोठडीमध्ये मारहाणीत मृत्यू झाल्याप्रकरणी रिसोड पोलीस ठाण्याच्या तत्कालीन ठाणेदारासह नऊ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा गुरुवारी सुनावली. वाशीम न्यायालयाचे जिल्हा सत्र न्यायाधीश जयसिंग झपाटे यांनी हा ऐतिहासिक निकाल दिला. हा निकाल पोलीस दलासाठी मोठा धक्का मानला जात असून गृह विभागात खळबळ उडाली आहे. अखेर तब्बल १५ वर्षांनंतर पीडित कुटुंबाला न्याय मिळाला.

वाशीम जिल्ह्याच्या रिसोड पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार महादेव धांडे यांच्यासह नऊ पोलीस कर्मचाऱ्यांनी हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील वाढोणा येथील पारधी वस्तीवर ९ मे २०११ रोजी धाड टाकली होती. या कारवाईदरम्यान बेग्या पवार या तरुणाला चोरीच्या एका गुन्ह्यात संशयित म्हणून पोलिसांनी अटक केली. त्या तरुणाला पोलीस कोठडीत ठेवण्यात आले होते. गुन्ह्याची कबुली मिळवण्यासाठी पोलिसांनी त्याला मारहाण केल्याचा आरोप होता. या मारहाणीमुळे




१० मे २०११ रोजी बेग्या पवार यांचा मृत्यू झाला. पोलिसांच्या ताब्यातील आरोपीचा मृत्यू झाल्याने मोठी खळबळ उडाली. तीव्र रोष व्यक्त करण्यात आला. सखोल तपासाची मागणी झाली. त्यानंतर चौकशीचे आदेश देण्यात आले होते.

**‘सीआयडी’कडून ३४ दिवस तपास; पोलिसांवर हत्येचा गुन्हा**

या घटनेनंतर गुन्हे अन्वेषण विभागाकडून ३४ दिवस तपास करण्यात आला. त्यानंतर संबंधित पोलिसांविरोधात हत्येसह विशेष ट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. या प्रकरणी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. त्यावर दीर्घकाळ न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाकडून साक्षी व पुरावे तपासण्यात आले. या प्रकरणात न्यायालयाने आज रिसोड पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार महादेव माणिक धांडे यांच्यासह पोलीस कर्मचारी मदन केशव पवार, शिवाजी नामदेव खिल्लारी, पंजाब माणिकराव पाटकर, रमेश सीताराम पवार, प्रकाश हिरालाल तारम, नागोराव भगवान खांडके, अशोक निवृत्ती वैद्य आणि वसंत कणिराम जाधव या नऊ जणांना दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

**..म्हणून पोलिसांकडून अडकवण्याचा प्रयत्न**

न्यायालयाच्या निकालानंतर बेग्या पवार यांच्या आई–वडिलांनी समाधान व्यक्त केले. अखेर न्याय मिळाला. आमच्या मुलावर कोणताही गुन्हा दाखल नव्हता. केवळ तो पारधी समाजातील असल्यामुळे पोलिसांनी त्याला या प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणात पीडित कुटुंबाची बाजू सरकारी वकील ड.श्रीराम काळू यांनी मांडली.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande (E-mail-prarambh2023@gmail.com

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा – ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा – बीड पिन – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा – ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा – बीड पिन – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे

सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
शनिवार दि. ०४ जुलै २०२६
4




# वेलतूर येथील भिल्ल आदिवासी कुटुंबियांचे चौथ्या दिवशीही आष्टी तहसील समोर उपोषण सुरूच

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील वेलतूर येथील भिल्ल आदिवासी कुटुंबाला विष्णू पाईप्स कंपनी व प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्याने २९ जुलै २०२६ रोजी पासून सर्व कुटुंबासह आष्टी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषणा ला बसले आहेत. तीन दिवस ऊलटूनही कोणी दखल घेतली नाही.आजचा चौथा दिवस आहे. या संदर्भातील निवेदन तहसीलदार आष्टी यांना सादर केले होते परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड व अंभोरा पोलीस स्टेशन यांनाही पाठवण्यात आल्या होत्या.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, वेलतूरी येथील भिल्ल आदिवासी कुटुंबीय मागील ३-४ वर्षांपासून वेलतूरी येथील गट नं. ८६ मधील संबंधित कंपनीच्या जागेमध्ये वास्तव्यास आहेत. या विष्णू पाईप्स कंपनीच्या कामादरम्यान सदर कुटुंबाच्या राहत्या झोपड्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विनापरवाना बेकायदेशीर मुख्य रस्ता बंद करण्यात आला आहे.यामुळे या कुटुंबाचे उपजिविकेचे गंभीर साधन हिरावले गेले आहे.प्रशासनाकडून कारवाईत टाळाटाळ या जाचाविरुद्ध व अन्यायाविरुद्ध पीडित कुटुंबाने यापूर्वी दि.१९ जुन २०२५ रोजी सविस्तर व सचित्र पुराव्यांसह प्रशासनाकडे निवेदन दिले होते. मात्र,आजतागायत कोणतीही ठोस चौकशी अथवा कारवाई झाली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. उलटपक्षी,खोटे गुन्हे दाखल करण्याची




धमकावणी,तसेच जीवे मारण्याची धमकी व पोलीस बळाचा वापर करण्याची भीती संबंधित घटकांकडून दाखवली जात असल्याचा गंभीर आरोप कुटुंबाने केला आहे. वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून योग्य न्याय मिळत नसल्याने, पीडित आदिवासी कुटुंबाने आता आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने स्थळ पाहणी करून संबंधित दोषींवर कायदेशीर कारवाई करावी,भिल्ल आदिवासी कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली आहे. आंदोलना दरम्यान काही जीवित वा अनपेक्षित हानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंपनी व प्रशासनाची राहील, असा इशारा उपोषणकर्त्या छबुबाई मस्तान गायकवाड व भिल्ल आदिवासी कुटुंबाने दिला आहे.



## मोठेवाडी येथील युवक विलास कदम यांचा सन्मान!

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील युवक विलास अशोक कदम यांची भारतीय सैनिक दलामध्ये देशसेवेसाठी निवड झाली आहे. या अभिमानास्पद कामगिरीबद्दल दि.०२ जूलै गुरुवार रोजी गवात फटाक्यांच्या आतिषबाजीत ग्रामस्थांनी विलास कदम यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मान केला. सत्कार समारंभात विलास कदम यांनी गावातील युवकांना मार्गदर्शन केले. अनुशासन, प्रामाणिकपणा आणि समर्पणाच्या जोरावर ध्येयप्राप्तीसाठी सातत्याने मेहनत करावी. अपयशाला खचून न जाता सातत्याने अभ्यास करावा तसेच राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असा संदेश त्यांनी दिला. आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय आई-वडील, गुरुजन आणि ग्रामस्थांचे सहकार्य व ▶▶ पान २ वर...

## माजी सैनिक तथा ज्येष्ठ सामाजिक आंदोलक प्रकाश वाघमारे यांना 'मा. उपनगराध्यक्ष शेख मुजीब उस्मान पुरस्कार-२०२६'

बीड । प्रतिनिधी

माजी सैनिक तथा ज्येष्ठ सामाजिक आंदोलक प्रकाश वाघमारे यांना युवा लोकमित्र (महाराष्ट्र शासन जाहिरात सूची समाविष्ट साप्ताहिक) यांच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा-२०२६ मध्ये 'मा. उपनगराध्यक्ष शेख मुजीब उस्मान पुरस्कार-२०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.




दि. २० जून रोजी ताज पॅलेस, कादरपुरा, बार्शी नाका, बीड येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. भारतीय सैन्यात उल्लेखनीय सेवा बजावल्यानंतर समाजातील विविध जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने लढा देणारे ज्येष्ठ सामाजिक आंदोलक म्हणून प्रकाश वाघमारे यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

देशसेवेबरोबरच शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि वंचित घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवून सामाजिक कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत युवा लोकमित्र परिवार, बीड यांच्या वतीने ▶▶ पान २ वर...

## गेवराईच्या भूमिपुत्राचा राज्यपालांच्या हस्ते गौरव

### बाबु कोकाट यांना कृषी क्षेत्रातील कार्याबद्दल राज्य शासनाचा शेतीमित्र पुरस्कार प्रदान

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील शेतकरी मित्र बाबु (त्रिंबक) कोकाट यांनी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल राज्य शासनाचा वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार बुधवार दि.१ जुलै रोजी वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, तसेच एक लाख वीस हजार रुपयांचा धनादेश




व सपत्नीक सत्कार असे पुरस्काराचे स्वरुप होते.

यावेळी कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री ड.आशिष जयस्वाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, आयुक्त सुरज मांढरे, कृषी पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र राज्याचे कृषीभूषण प्रकाश पाटील, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी कर्मचारी तसेच राज्यातील कृषि पुरस्कार प्राप्त विजेते शेतकरी तसेच आदि मान्यवर उपस्थित होते.


शेतकरी मित्र बाबु कोकाट यांनी गेल्या सात- आठ वर्षात संध्या मल्टी सर्व्हिसेस व सी.एस.सी केंद्रामार्फत युवा शेतकरी मित्र संकल्पनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मोठी कसरत घेवून शेतकरी ▶▶ पान २ वर...

## संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी व्हा

### अखिल भारतीय वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष हरिदासभाऊ जोगदंड यांचे आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ जगदगुरु तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात आळंदी ते पंढरपूर सुरुवात होत असुन या आषाढी वारी पालखी सोहळ्यात विठ्ठलभक्त वारकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अखिल भारतीय वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष ह.भ.प.हरिदास भाऊ जोगदंड यांनी केले आहे. तसेच संत बंकटस्वामी महाराजांच्या दोन्ही दिंडयांमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.



जगदगुरु संत श्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दि. ७/७/२०२६ रोजी व श्री.संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे दि. ८/७/२०२६ रोजी प्रस्थान होणार आहे. प्रतिवर्षी या पालखी सोहळ्यात लाखो वारकरी भक्त मोठ्या संख्येने उपस्थिती असतात. टाळमृदंगाची साथ,मुखी विठ्ठलाचे नामस्मरण करीत मल दरमजल चालणाऱ्या वारकऱ्यांसाठी सर्व स्तरातुन मदतीचा घ असतोच विशेष म्हणजे या वारीसाठी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर लोकांची उपस्थिती दिसून येऊ लागली आहे. विठ्ठल भक्तीची ओढ आणि विठ्ठल रुखमाईच्या दर्शनासाठी नाचत गात जो तो वारकरी हरिनामाच्या गजरात धुंद होतांना दिसतो. मराठवाडयातुन व बीड जिल्ह्यातुन श्री.संत ▶▶ पान २ वर...

## विजय कोठुळे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

शहराजवळील चिंचगव्हाण येथील रहिवाशी विजय सदाशिव कोठुळे (वय,३९ वर्ष) यांचे दि ०२ जुलै गुरुवार रोजी सकाळी ५:०० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.रात्री छातीत तीव्र वेदना होत असल्याने ते स्वतः रात्री १ वाजता संजीवनी हॉस्पिटलमध्ये भरती झाले होते. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून डॉक्टरांनी त्यांना रात्री ३:०० वाजण्याच्या दरम्यान बीड येथे अन्जिओग्राफी करण्यासाठी रेफर केले; परंतु रस्त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या अकस्मात जाण्याने कोठुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळा आहे. विजय कोठुळे यांनी अल्पकाळात यशस्वी उद्योजक म्हणून ओळख निर्माण केली होती. दुपारी १:०० वाजता चिंचगव्हाण स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी त्यांनी जोडलेले असंख्य मित्रपरिवार, विविध खात्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.त्यांच्या पश्चात आई,पत्नी,एक मुलगा,एक मुलगी, भाऊ,भावजय असा परिवार आहे. चिंचगव्हाणचे माजी सरपंच वसंत उगले यांचे ते मावसभाऊ होत.



## कोल्हारवाडी येथे लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्याचे वाटप

बीड । प्रतिनिधी

शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या जयंतीनिमित्त कोल्हारवाडी येथे शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शिवसंग्रामचे पाली सर्कल प्रमुख अशोक सिंघन यांच्या वतीने या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे , गोरख अण्णा सिंगन, बीड तालुका अध्यक्ष पंडित माने आणि युवकचे जिल्हाध्यक्ष सुनील कुटे उपस्थित होते. तसेच कोल्हारवाडीच्या उपसरपंच मनीषा सिंघण, ग्रामपंचायत सदस्य अशोक हाडूळे, सिताराम मुळे आणि रमेश रांजवन यांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांमध्ये जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्ति मॅडम, सपकाळ मॅडम यांच्यासह दोन्ही अंगणवाडीच्या अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या. याशिवाय सगन वायभट, रंजीत मुळे, दत्ता रांजवन, भरत सपकाळ,अंकुश जुळे, संतोष रांजवन, राजेश चोरमले, विकास हाडूळे, विशाल सपकाळ आणि गावातील नागरिक, महिला व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संपत शेळके सर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सपकाळ मॅडम यांनी मानले. लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या स्मृतींना उजाळा देत सामाजिक भान जपणार्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## पेंडगाव येथे झिरो एनर्जी कूलिंग चेंबर उभारणीचे प्रात्यक्षिक संपन्न

पेंडगाव । प्रतिनिधी

के.एस के कृषी महाविद्यालय, बीड यांच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव (ठ-थए) कार्यक्रमांतर्गत कृषिदूतांनी पेंडगाव येथे झिरो एनर्जी कूलिंग चेंबर (नशी एपशीसू उेश्रळपस उहरालशी) उभारणी व वापराबाबत प्रात्यक्षिक आयोजित केले.




या प्रात्यक्षिकामध्ये शेतकऱ्यांना वीट, वाळू व पाण्याच्या साहाय्याने वीजेशिवाय कार्य करणारे झिरो एनर्जी कूलिंग चेंबर कसे तयार करावे, त्याची देखभाल कशी करावी तसेच फळे, भाजीपाला व फुलपिकांची काढणीनंतरची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी त्याचा कसा उपयोग होतो याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. या तंत्रज्ञानामुळे पिकांचा ताजेपणा अधिक काळ टिकून राहतो, वजनातील घट कमी होते तसेच बाजारभाव अनुकूल मिळेपर्यंत उत्पादन सुरक्षित ठेवता येते, असे मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमास गावातील शेतकरी, महिला शेतकरी तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पेंडगाव येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना झिरो एनर्जी कूलिंग चेंबरचे महत्त्व, कार्यपद्धती व शेतीमधील उपयुक्तता याविषयी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे माहिती देण्यात आली. उपस्थितांनी विविध प्रश्न विचारून या तंत्रज्ञानाविषयी उत्सुकता व्यक्त केली. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक प्रा. डी. बी. राठोड, कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. जी. गार्डी व प्रा. डी. डी. शिंदे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी कृषिदूत ऋषिकेश अगळे, मिथुन आहेर, अमित दळवी, गणेश भुसनर, रवी चव्हाण, कृष्णा चौरे, ऋतिक भांगरे, ज्ञानेश्वर दरेकर, स्वप्नील बांगर आणि प्रवीण बनोथ उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व प्रात्यक्षिक कृषिदूतांनी यशस्वीरित्या पार पाडले.

## शारीरिक शिक्षण विभागातील कर्तव्यदक्ष व गुणवंत प्रा.डॉ. नवले प्रियांका जीवन यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

बीड । प्रतिनिधी

ऑल इंडिया कबड्डी पंचपरीक्षा उन्तीर्ण झाल्या आहेत बीड जिल्हाची व मराठवाडाची पहिली रणरागिणी महिला क्रीडाक्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत डॉ. नवले प्रियांका जीवन यांनी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्ञरललरवळ पंच परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एवढेच नव्हे, तर मराठवाड्यातील पहिल्या महिला राष्ट्रीय ज्ञरललरवळ पंच म्हणून मानाचा बहुमानही त्यांनी प्राप्त केला आहे. ही उपलब्धी त्यांच्या अथक परिश्रम, निष्ठा, समर्पण आणि क्रीडाप्रेमाची साक्ष देणारी आहे.



या अभिमानास्पद यशाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! त्यांच्या भावी वाईट चालीस उत्तरोत्तर यश, कीर्ती आणि नवीन शिखरे सर करण्यासाठी हार्दिक शुभेच्छा. त्यांच्या या प्रेरणादायी कार्यातून अखिल भारतीय मराठा महासंघच्या वतीने सत्कार व खुप खुप शुभेच्छा देन्यात आल्या,या वेळी अखिल भारतीय मराठा महासंघचे विभागीय मराठवाडा सरचिटनस मा.विनोद आप्पा इंगोले,अ.भा.मराठा महासंघाचे बीड जिल्हा ▶▶ पान २ वर...

## बीडच्या अटल अमृत पाणीपुरवठा योजनेप्रकरणी हायकोर्टाची दखल; संबंधितांना नोटिसा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील ११४ कोटी रुपयांच्या अटल अमृत पाणीपुरवठा योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते सय्यद सादेक यांनी दाखल केलेल्या याचिकेची छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. याचिका स्वीकारून संबंधित अधिकारी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.



याचिकेनुसार, सुमारे ११४ कोटी रुपयांची योजना असूनही जवळपास १०० कोटी रुपये खर्च झाल्यानंतरही बीड शहरातील नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा मिळत नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. या प्रकरणी माहितीच्या अधिकार (आरटीआय) अंतर्गत माहिती मागवूनही प्रशासनाने समाधानकारक प्रतिसाद न दिल्याने सय्यद सादेक यांनी न्यायालयाचे दार ठोठावले. उच्च न्यायालयाने संबंधित अधिकारी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला नोटिसा बजावत २८ जुलै २०२६ पर्यंत न्यायालयात आपले म्हणणे सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

ही याचिका छत्रपती संभाजीनगर येथील ड. पंकज कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली दाखल करण्यात आली असून, बीड येथील ड. प्रवीण नेहरकर आणि ड. शिवाजी सपकाळ यांनीही या प्रकरणात कायदेशीर कामकाज पाहिले.

## राजेंद्र मस्के यांचा वाढदिवस उत्साहात साजरा!

### संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सत्कार करून दिल्या शुभेच्छा!

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी बीड येथील राशी निवासस्थानी आयोजित अभिष्टचिंतन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक, शैक्षणिक, सहकार, व्यापारी व राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, अंतरवाली सराटी येथे संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी राजेंद्रजी मस्के यांचा प्रेमपूर्वक सत्कार करून वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी व्यक्त झालेला स्नेह, आत्मीयता आणि परस्परांप्रती असलेला आदर हा समाजकारणातील जिव्हाळ्याच्या नात्याचा प्रत्यय देणारा ठरला.

यावेळी भावना व्यक्त करताना राजेंद्रजी मस्के म्हणाले, ''संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी माझ्यावर व्यक्त केलेले प्रेम, आत्मीयता आणि आशीर्वाद ही माझ्यासाठी प्रेरणादायी ऊर्जा आहे. त्यांच्या या स्नेहाबद्दल मी मनःपूर्वक ऋणी असून त्यांचे हार्दिक आभार व्यक्त करतो. आपल्या सर्वांच्या प्रेम, विश्वास आणि शुभेच्छांच्या बळावर समाजहित, जनसेवा आणि सर्वसामान्यांच्या न्यायहक्कासाठी अधिक जोमाने कार्य करत राहीन.''

यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजेंद्रजी मस्के यांच्या संघटन कौशल्याचे, समाजाभिमुख कार्याचे तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने ▶▶ पान २ वर...

